| | | | |
|---|---|---|---|
| MHWR030116742018 | खटला दाखल तारीख | – | २९.१२.२०१८ |
| | खटला नोंदणी तारीख | – | २९.१२.२०१८ |
| | खटला निकाल तारीख | – | १८.०७.२०२६ |
| | कालावधी | ७ व., ६ म., १९ दि. | |

**भाग –' अ '**

**Form No. XXXII**

**(Title Page of the Judgment)**

**(Para 44 (i) of Chapter VI of Criminal Manual)**

**विद्यमान मुख्यन्यायदंडाधिकारी, वर्धा यांचे न्यायालयात**

(पीठासीन अधिकारी – श्रीमती एम.वाय.डोईफोडे)

**नियमित फौजदारी खटला क्र.७७१/२०१८** **अपराध क्र.७७१/२०१८**
**निशाणी क्र.३०**

महाराष्ट्र शासनातर्फे पोलिस ठाणे अधिकारी,
पोलिस ठाणे वर्धा शहर, ता. व जि. वर्धा. ... **सरकार पक्ष**

**विरुध्द**

सज्जु उर्फ सज्जो नईमखाँ पठाण,
वय अंदाजे ४८ वर्ष, कामधंदाः मजुरी,
राह. स्टेशनफैल, वर्धा, तालुका व जिल्हा वर्धा. ... **आरोपी**

==========================================

सरकार पक्षातर्फे सरकारी वकील – श्री.एस.एम.दुंगे
आरोपीतर्फे लोकअभिरक्षक – कु.के.पी.गडपाल.

==========================================

**भारतीय दंड संहिता १८६० चे कलम २९४ व ५०६ प्रमाणे दोषारोप.**

**भाग –' ब '**

**(Para 44 (ii) of Chapter VI of Criminal Manual)**

| | | |
|---|---|---|
| १ | गुन्हा घडल्याचा दिनांक | १९.०५.२०१८ |
| २ | प्रथम खबर अहवाल दिनांक | १९.०५.२०१८ |
| ३ | दोषारोप पत्र दाखल झाल्याचा दिनांक | २९.१२.२०१८ |
| ४ | दोषारोप निश्चिती दिनांक | २१.०२.२०१९ |
| ५ | पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | ०३.०३.२०२३ |
| ६ | न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | ०७.०७.२०२६ |
| ७ | न्यायनिर्णयाचा दिनांक | ०७.०७.२०२६ |

## आरोपीचा तपशील

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामीन दिनांक | गुन्हयाचे कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा सुनावली | बंदीवान म्हणून असलेला कालावधी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सज्जु उर्फ सज्जो नईमखाँ पठाण | २५.०५.२०१८ | २५.०५.२०१८ | भा.दं.सं. चे कलम २९४ व ५०६ अन्वये | निर्दोष | निर्दोष | --- |

## भाग –' क'

**(Para 44 (iii) of Chapter VI of Criminal Manual)**

**LIST OF PROSECUTION/DEFENCE/COURT WITNESSES**

**अ. अभियोग पक्ष –**

| अनु.क्र. | साक्षीदारांची नांवे | निशाणी | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १. | देवराव वामनराव इंगोले | नि.क्र.१० | घटनास्थळ पंच |
| २. | मोना अखिलेश भोंगाडे | नि.क्र.१९ | फिर्यादी. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | संध्या राजू रहांगडाले | नि.क्र.२२ | साक्षीदार. |
| ४. | संगीता दिपक जाधव | नि.क्र.२६ | तपासी अंमलदार. |

**ब.** **<u>बचाव पक्षाचे साक्षीदार जर असतील तर</u>** –

| अनु.क्र. | नांवे | निशाणी | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

**क.** **<u>न्यायालयीन साक्षीदार असतील तर</u>** -

| अनु.क्र. | नांवे | निशाणी | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

**<u>न्यायालय निशाणी कागदपत्रांची यादी</u>**

**ड.** **<u>अभियोग पक्ष</u>** -

| अनु.क्र. | कागदपत्रे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | फिर्याद | २० |
| २. | छापील प्रथम खबर | २१ |
| ३. | घटनास्थळ पंचनामा (Admitted) | २३ |
| ४. | अटक फॉर्म (Admitted). | २४ |

**इ.** **<u>बचाव पक्ष</u>** -

| अनु.क्र. | कागदपत्रे | निशाणी क्र. |
|---|---|---|
| --- | --- | --- |

**ई.** **<u>भौतीक वस्तु</u>** -

| अनु.क्र. | भौतिक वस्तु क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| --- | --- | --- |

# न्यायनिर्णय

(घोषीत दिनांक १८.०७.२०२६)

सरकार पक्षाचे कथन थोडक्यात असे कि, फिर्यादी श्रीमती मोना अखिलेश भोंगाडे ही शाहु मेडीकल, बोरगांव–मेघे, वर्धा येथे सेल्समन म्हणून नोकरी करते. तिचे पती दोन वर्षापुर्वी मरण पावले असून ती तिचा भाऊ ललीत रहांगडाले याचेसोबत स्टेशन फैल, वर्धा येथे राहते. ती राहत असलेल्या घरापासून काही अंतरावर सज्नो नईमखाँ पठाण म्हणजेच आरोपीचे मकान असून तिच्या घरी बक–या आहेत. तसेच ती अवैद्यरित्या दारुचा व्यवसाय करते. दोन तिन दिवसाआधी सज्नो नईमखाँ पठाण हिच्या बक–या बिमारीमुळे मरण पावल्या होत्या.

२. दि.१९.०५.२०१८ रोजी सकाळी ८.०० वाजताच्या सुमारास फिर्यादी तिची वहिणी सौ.पायल रहांगडाले हिचेसोबत घरी हजर असतांना त्यावेळी त्यांचे घराशेजारी राहणारी सज्नो नईमखाँ पठाण म्हणजेच आरोपी तिच्या घरासमोर रोडवर आली व तिला तुच माझ्या बक–या मारल्या असे म्हणून जोरजोराने, 'बारकी गांडीची, वेश्याचा धंदा करते, साली छिनाल' असे म्हणून अश्लील शब्दात शिविगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर फिर्यादीने पोलीस स्टेशन वर्धा शहर येथे जावून आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली.

३. सदरील फिर्यादीच्या आधारे पोलीस ठाणे वर्धा शहर यांनी गुन्हा क्र.७११/२०१८ भा.दं.वि. चे कलम २९४ व ५०६ प्रमाणे आरोपीविरुध्द दाखल केला. सदर गुन्हयाचा तपास संगीता तामगाडगे, ना.पोलीस शिपाई ब.क्र.११२९ यांचेकडे सोपविण्यात आला. त्यानंतर दोन पंचांना सूचनापत्र देवून घटनास्थळी बोलाविले व त्यांचेसमक्ष घटनास्थळाचा

पंचनामा केला. त्यानंतर त्यांनी फिर्यादी व साक्षीदारांचे जबाब नोंदविले. आरोपीला अटक करण्यात आली. नियमित तपास पुर्ण करुन आरोपीविरुध्द पुरावा मिळून आल्याने तिच्या विरुध्द खटला भरविण्यासाठी न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

४. आरोपीविरुध्द नि.क्र.२ प्रमाणे गुन्हयाचे दोषारोप ठेवण्यात आले व तिची जबानी नि.क्र.३ प्रमाणे नोंदविण्यात आली. आरोपींने गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व प्रकरण चौकशीकामी हाती घेण्याची विनंती केली.

५. आरोपीविरुध्द प्रकरणात पुरावा मिळून आल्याने तिचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३ प्रमाणे बयाण नि.क्र.२८ वर नोंदविण्यात आले. आरोपीने गुन्हा नाकबूल असल्याचे सांगितले.

६. माझे समोर दिलेला पुरावा, अभियोग पक्षाचे वकील व आरोपीचे वकील यांनी केलेला युक्तीवादाचा विचार करुन खालील प्रश्न निर्णित करणेकरिता उपस्थित झाले. त्यासमोर नोंदविलेले निष्कर्ष त्याखालील दिलेल्या कारणांकरिता नोंदविलेले असून ते पुढील प्रमाणे–

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सरकार पक्षाने हे सिध्द केले काय की, दिनांक १९.०५.२०१८ रोजी सकाळी ८.०० वाजता वार्ड क्र.३१, स्टेशनफैल, वर्धा येथे आरोपीने फिर्यादीस 'बारकी गांडीची, वेश्याचा धंदा करते, साली छिनाल' अशा अश्लील भाषेत शिवीगाळ केली व त्याद्वारे तिने भारतीय दंड संहिताचे कलम २९४ नुसार दंडनिय अपराध केला ? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, उपरोक्त दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी दिली, त्यावरुन तिने भा.दं.वि. चे कलम ५०६ नुसार दंडनिय अपराध केला? | नकारार्थी |
| ३. | आदेश काय ? | आरोपीला अंतिम आदेशाप्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

७. सरकार पक्ष व बचाव पक्षाचा युक्तीवाद ऐकला.

**मुद्दा क्र.१ व २ बाबत** -

८. आरोपीवरील वर नमूद आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने एकूण चार साक्षीदार तपासले आहेत. त्यापैकी पंच साक्षीदार देवराव वामनराव इंगोले (स.सा.१) (नि.क्र.१०) याने सरकार पक्षास सहकार्य केलेले नाही. बचावपक्षाने घटनास्थळ पंचनामा नि.क्र.२३ मान्य केलेला असल्याने सदर पंच साक्षीदार हा जरी सरकार पक्षास सहकार्य करीत नाही तरी घटनास्थळ पंचनामा हा आरोपीस मान्य आहे. त्यामूळे घटनास्थळ हे आरोपी व फिर्यादी यांचे घर फिर्यादीच्या घरासमोरील सार्वजनिक रस्त्यावर घडल्याचे दिसून येते.

९. सरकार पक्षाने सदर प्रकरणात फिर्यादी हिचा पुरावा घेतला असून फिर्यादी ही औषध विक्रेते यांचेकडे नोकरी करते. तिचे पती सन २०१६ मध्ये मयत झाले त्यामूळे ती, तिचा भाऊ ललीत, आई संध्या व वहिणी पायल व त्यांची दोन मुले यांच्यासह स्टेशनफैल येथे राहते.

१०. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार घटना ही दि.१९.०५.२०१८ रोजी सकाळी

८.०० वाजता त्याचे घरासमोरील सार्वजनिक रस्त्यावर घडली. आरोपी आली व तिने बक–यांवरुन वाद घालून फिर्यादी व तिच्या वहिनीला शिविगाळ केली. शिवीगाळी मध्ये 'तु वेश्या आहे, तु धंदा करते' असे म्हणून जिवे मारण्याची धमकी दिली त्यामूळे फिर्यादीला भिती वाटली, लाज वाटली व तिने फिर्याद नि.क्र.२० व छापील पहिली खबर नि.क्र.२१ दाखल केली.

११. सदर फिर्यादीवरुन तपास अधिकारी श्रीमती एस.डी.जाधव ब.क्र.११२९ पोलीस हवालदार, विशेष शाखा, वर्धा यांनी सदर गुन्हयाचा तपास केला म्हणून सरकार पक्षाने त्यांचा पुरावा नोंदविला. त्यांचे असे म्हणणे आहे की दि.२४.०५.२०१८ रोजी पोलीस स्टेशन, वर्धा येथे त्या नापोशी म्हणून कार्यरत होत्या. त्यावेळी त्यांचे नाव संगीता नानाजी तामगाडगे होते. अपराध क्र.७११/२०१८ ची केस डायरी त्यांना तपासकामी मिळाली होती. सदर गुन्हयाचा पुर्वी तपास सतिश दुधाने व सुरेश दुर्गे यांनी केला. तपास मिळाल्यानंतर साक्षीदारांची बयाणे नोंदविली. आरोपीस अटक केली व सबळ पुरावा मिळाल्यामूळे दोषारोपपत्र दाखल केले.

१२. सरकार पक्षाने फिर्यादीची आई संध्या राजु रहांगडाले (सा.क्र.३) हिचा पुरावा नोंदविला. तिचे पुराव्यात असे आले आहे की, ती आरोपीला ओळखते. फिर्यादी, तिची मुलगी व पायल ही तिचा मुलगा ललीत याची पत्नी आहे. फिर्यादीचे पती मयत झाल्यामूळे ती तिच्याच कडे राहते. घटना ६ ते ७ वर्षापुर्वी त्यांचे घरासमोरील सार्वजनिक रस्त्यावर घडली. त्या ठिकाणी आरोपी आली व तिने वाद घालून शिविगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिली व त्यामूळे त्यांना भिती वाटली.

१३. वरील संपुर्ण सरतपास नोंदविला. त्यावेळी फिर्यादीचे बचाव पक्षातर्फे

उलटतपास नोंदविण्यात आला. त्यामध्ये फिर्यादी मान्य करते की ती औषधी दुकानात काम करते. वेळ सकाळची ही घाईची असल्यामुळे ती घरकामात व्यस्त असते घराबाहेर काय सुरु असते हे तिला माहित नसते. आरोपीच्या घरी बक–या आहे व त्या कारणाने आरोपी व फिर्यादीच्या भावामध्ये जुना वाद होता या बाबी फिर्यादीने मान्य केलेल्या आहे. परंतु त्या वादावरुन फिर्याद देण्याचे त्यांनी ठरविले हे तिने नाकारले व आरोपीने शिविगाळ केली नाही ही बाब सुध्दा नाकारलेली आहे.

१४. बचाव पक्षाचा युक्तीवाद असा आहे की फिर्यादीचा भाऊ व आरोपी यांचेमध्ये जुना बक–यांबाबत वाद होता ही बाब फिर्यादीने मान्य केली. तसेच फिर्यादीची आई संध्या सा.क्र.३ हिने सुध्दा तिचे उलटतपासात मान्य केलेली आहे. तसेच तपास अधिकारी यांनी सुध्दा फिर्यादीचा भाऊ व आरोपीमध्ये बक–यांचा कारणावरून जुना वाद होता हे बाब निष्पन्न झलेली होती असे कबुल केले आहे.

१५. विशेष म्हणजे बचाव पक्षाचा युक्तीवाद असा आहे की फिर्यादीची आई सा.क्र.३ हिने तिचे उलटतपासात असे मान्य केले की, ''हे म्हणणे खरे आहे की त्यावरुन आम्ही घरच्यांनी आरोपीविरुद्ध फिर्याद देण्याचे ठरविले होते. हे म्हणणे खरे आहे की त्यामूळे आम्ही फिर्यादीला फिर्याद देण्यास सांगीतले''. या बाबी बघता घटनास्थळ हे जरी सार्वजनिक ठिकाण असले तरी फिर्यादीची आई ही घटनास्थळावर होती किंवा कसे याबाबतचा कोणताही पुरावा सरकार पक्षाने अभिलेखावर आणला नाही. फिर्यादीने तिचे पुराव्यात सांगीतलेली, 'तु वेश्या आहे, तु धंदा करते' ही बाब जरी जशीच्या तशी विचारात घेतली तरी सदरच्या वाक्याने घटनास्थळावर त्यावेळी इतर कोण हजर होते व त्यांना त्या वाक्याने उपद्रव झाला याबाबतचा कोणताही पुरावा सरकार पक्षाने अभिलेखावर आणलेला

नाही.

१६. वरील मुद्दयावर बचाव पक्षाद्वारे ***मा.मुंबई उच्च न्यायालयाचे नरेंद्र एच. खुराणा व इतर विरुध्द पोलीस आयुक्त व इतर*** हा न्यायनिवाडयाचा आधार घेण्यात आला आहे. त्यामध्ये, ‘Time and again it is well established that mere performance of obscene or indecent act is not sufficient but there must be a further proof to establish that it was to the annoyance to others. Annoyance to others is essential to constitute an offence under this section. Where there is no evidence recorded about the language used or act done causes annoyance to anybody, a conviction under this section cannot be sustained. From the wording of this section I is clear that annoyance should be caused to the others. This section does not limit the scope of the word ,"others" to mean the person who is intended victim of the obscene act. It is enough if the obscene act is committed in public and causes annoyance to anybody be he the contemplated victim of the offender or not".

१७. तेव्हा सरकार पक्षाने घटनास्थळावर त्यावेळी इतर व्यक्तींना सदर वाक्याने उपद्रव (annoyance) झाला ही बाब कोठेही सिध्द केलेली नाही. एवढेच नसून आरोपी व फिर्यादी हिचा भाऊ यांचेमध्ये बक–यांबाबतचा वाद हा जुना होता व त्यामूळेच सदरची

फिर्याद दाखल केली तेव्हा भां.द.वि.चे कलम २९४ व ५०६ याचे शिक्षेचे दंडात्मक प्रावधान दिलेले आहे. त्यामूळे पुराव्यामध्ये आरोपी व फिर्यादी यांचेमधील वैरभाव हा बचावपक्षाने अभिलेखावर आणलेला आहे व अश्या प्रकारचे गुन्हे घडतांना वरील आरोपीने बोललेले शब्द हे केलेले कृत्य न्यायालयासमक्ष सांगणे सोपे असते त्यामूळे वापरलेले शब्द सांगणे हा पुरावा कमी लागतो परंतु त्या परीस्थीतीमध्ये उत्पन्न झालेला उपद्रव (annoyance) सिध्द करणे गरजेचे आहे. तेव्हा बचाव पक्षाने उलटतपासामध्ये फिर्यादी व तिच्या आईला दिलेल्या सुचना बघता आरोपी व फिर्यादीचा भाऊ यांचेमध्ये पुर्वीपासून बक–यांबाबत वाद होता. सदर प्रकरणात फिर्यादीचा भाऊ याचा जबाब सुध्दा नाही व त्याची पत्नी साक्षीदार असून ती न्यायालयासमक्ष पुरावा देणेकामी सरकार पक्षाने हजर केलेले नाही. तेव्हा बचाव पक्षाने युक्तीवादाचे समर्थनार्थ दाखल केलेला न्यायनिर्णयाचे निकष लागू होतात. The first limb of the question raised in this reference in the negative and state that act pers se indecent and obscene would not warrant prosecution under section 294 of the Indian Penal Code in absence of express evidence of annoyance by any of the person.

१८.		तेव्हा अश्या परीस्थीतीत सदरचा गुन्हा हा सिध्द करतेवेळी सरकार पक्षाने केवळ फिर्यादी व तिची आई यांनाच पुराव्याकामी तपासलेले आहे. पुर्वीपासूनच्या वादामूळे आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये नातेसंबध हे ताणले गेलेले दिसून येतात त्यामूळे केवळ दोन साक्षीदारांच्या पुराव्यावरुन तसेच 'तु वेश्या आहे, तु धंदा करते' या वाक्याने त्यांना केवळ भिती वाटली एवढीच बाब अभिलेखावर आलेली आहे. तेव्हा अश्या परिस्थितीत अभियोग

पक्ष सार्वजनिक रस्त्यावर घडलेल्या सदर बाबींमूळे फिर्यादी अपमानीत झाली परंतु त्यामूळे इतरांना उपद्रव/वैताग या सामोरे जावे लागले ही बाब सिध्द झालेली नाही. तसेच जिवे मारण्याची धमकी दिली हे सुध्दा सिध्द होत नाही. आरोपीविरुध्द भा.दं.वि. चे कलम २९४ व ५०६ चा गुन्हयाचे तत्व संशयापलीकडे सिध्द करण्यास अपयशी ठरले असल्यामूळे मुद्दा क्र.१ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.३ बाबत</u>** –

१९. सरकार पक्ष आरोपीविरुद्धचा गुन्हा सिध्द करण्यास अपयशी ठरल्यामूळे आरोपी ही सुटकेस पात्र आहेत. करीता मुद्दा क्र.३ च्या उत्तरार्थ मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी सज्जु उर्फ सज्जो नईमखॉं पठाण हिला फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८ (१) प्रमाणे भा.दं.वि.च्या कलम २९४ व ५०६ या शिक्षेस पात्र अपराधातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे बंधपत्र व जात मुचलके रद्द करण्यात येत आहेत. आरोपीला आदेशीत करण्यात येते कि तिने फौजदारी प्रकिया संहिता कलम ४३७-अ च्या तरतुदीची पुर्तता करावी.

MRUNAL YASHWANT DOIPHODE
Digitally signed by MRUNAL YASHWANT DOIPHODE
Date: 2026.07.18 16:08:33 +0530

वर्धा (श्रीमती एम.वाय.डोईफोडे)
दिनांक १८/०७/२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी, वर्धा.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of steno | : | R.V.Sirsikar Gr.II |
| Court Name | : | Ct. of Chief Judicial Magistrate, Wardha |
| Judgment Date | : | 18.07.2026 |
| Dictated on | : | 18.07.2026 |
| Typed on | : | 18.07.2026 |
| Checked & Signed by Presiding officer on | : | 18.07.2026 |
| Uploaded on | : | 18.07.2026 |